# 'मेट्रो ३'च्या भुयारीकरणाचा तेरावा टप्पा पूर्ण

» मुंबई (प्रतिनिधी) :

कुलाबा ते सीप्झ या 'मेट्रो ३' भुयारी मार्गिकेवरील भुयारीकरणाच्या तेराव्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. विधानभवन मेट्रो स्टेशनजवळ 'सूर्या २' हे टनेल बोअरिंग मशीन (टीबीएम) शुक्रवारी भुयारातून बाहेर आले. या यंत्राद्वारे कफ परेड ते विधानभवन स्थानक या १.२४ किलोमीटर अंतराचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

कफ परेड स्थानकापासून या भुयारी टप्प्याची सुरुवात झाली आहे. याचे भुयारीकरण सुरू करण्यापूर्वी व प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतरही अनेक वादांना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला (एमएमआरसी) तोंड द्यावे लागले होते. अनेक न्यायालयीन लढ्यांनंतर कुठे या मार्गातील अडसर दूर होऊन साधारणपणे २०० दिवसांत हा टप्पा पूर्ण करण्यात एमएमआरसीला यश आले आहे.



कफ परेड येथे खोदलेल्या विवरात ६०० मेट्रिक टन वजनाचे 'सूर्या २' हे टीबीएम उतरवण्यात आले होते. त्याची लांबी ९५ मीटर इतकी आहे. प्रत्येक दिवशी सात रिंग्ज या वेगाने भुयारीकरणाचे काम या यंत्राद्वारे केले गेले. २०५ दिवसांनंतर हे भुयार पूर्ण झाले. भुयारीकरणाच्या तेराव्या टप्प्यासाठी एकूण ८३८ रिंग्सचा वापर करण्यात आला आहे. या भुयाराच्या कामामुळे 'पॅकेज १'मधील ५.८९ किलोमीटरपैकी २.४८ इतके भुयारीकरण पूर्ण झाल्याचे एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.